दैनिक

बीड । रविवार
१५.१२.२०२४
वर्षे : ४ अंक : २४८
किंमत : ३ रू. पाने : ४

मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 dailymarathwadapatra2021@gmail.com https://epaper.marathwadapatra.com पान -१

उद्या काही स्फोट होईल तर...

संतोष देशमुख हत्या प्रकरणी संभाजीराजेंचा फडणवीसांना इशारा

बीड, दि. १४ (मराठवाडा पत्र न्युज):- बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे ९ डिसेंबर अपहरण करून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेनंतर बीड जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात मोठी खळबळ उडाल्याचे पाहायला मिळाले. संतोष देशमुख यांचं अपहरण झाल्यानंतर त्यांचे कुटुंबिय, निकटवर्तीय व मित्र परिवाराने त्यांचा सर्वत्र शोध घेतला. मात्र, ते कुठेच आढळून आले नाहीत. त्यानंतर त्यांचा मृतदेह सापडला. हे प्रकरण आता चांगलेच पेटले असून आरोपींना शिक्षा मिळावी यासाठी राजकीय क्षेत्रातूनदेखील राज्य सरकारवर दबाव टाकला जात आहे. यादरम्यान संभाजीराजे छत्रपती यांनी आज (१४ डिसेंबर) संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या प्रकरणात लक्ष देण्याची विनंती केली आहे. मस्साजोग गावात संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची भेट घेत्यानंतर माध्यमांशी बोलताना संभाजीराजे म्हणाले की, ''माझी मुख्यमंत्र्यांना विनंतीपूर्वक सूचना आहे की तुम्ही जातीने यामध्ये लक्ष घाला. अजूनही हा विषय हातातला आहे. लोकांच्या भावना मी ऐकल्या , उद्या काहीतरी स्फोट होईल तर मी जबाबदार असणार नाही. पोलीसांनी साडेतीन तास मजा बघत साधा गुन्हा नोंद केला नाही, आणि त्या वाल्मिकी कराडला गुन्हा नोंद करूनही तो इकडे तिकडे फिरतो आहे. हे सरकारला कसं चालतंय?'' असा सवाल संभाजीराजेंनी ▶▶पान २ वर

लिंबागणेश जि.प.गटात विकासकामाचे उद्घाटन

बेलखंडी फाटा-नागझरी ते नामाजीबुवा रस्त्याचा शुभारंभ

बीड, दि. १४ (मराठवाडा पत्र न्युज):- लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील डोंगरभागातील गावांचे दळवळण सोयीस्कर व्हावे यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत बेलखंडी फाटा-नागझरी ते नामाजी बुवा मंदीरापर्यंतच्या एकूण साडेसहा किलोमीटर डांबरी, एकूण साडेतीन कोटी रुपयांच्या रस्ता कामाचे उद्घाटन करण्यात आले. दरम्यान निवडणुकीत विजयी झाल्यानंतर आ.क्षीरसागर पहिल्यांदा या भागात आल्यामुळे नागरिकांनी मोठ्या जल्लोषात त्यांचे स्वागत केले. लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील डोंगरभागात असणाऱ्या गावांचे दळवळण सोयीस्कर व्हावे. येथील लोकांना सोयीसुविधेच्या उपलब्धतेसाठी वाहतूक व्यवस्था सक्षम असावी यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांच्या पाठपुराव्यातून ईजिमा ११५ ते नागझरी फाटा ते नामाजीबुवा मंदीरापर्यंत ०/०० ते ६/३०० च्या एकूण साडेसहा किलोमीटर अंतर असलेल्या डांबरी रस्त्याच्या कामाला मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजुरी मिळाली. ▶▶पान २ वर

वाल्मिक कराड यांच्या समर्थनार्थ वडवणी कडकडीत बंद

वडवणी, दि. १४ (मराठवाडा पत्र न्युज):- जनसेवक वाल्मिक आण्णा कराड यांच्यावर राजकीय व्दोषापोटी काही राजकीय मंडळीने विनाकारण त्यांना खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकवण्याचं षडयंत्र सुरू केले आहे. त्यांच्यावरील खोटे गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत यासाठी काल वडवणी शहर बंद ठेवण्यात आले. याबाबत सविस्तर माहिती अशी की, बीड जिल्ह्यात वाढत्या लोकप्रियतेमुळे जनसेवक वाल्मिक आण्णा कराड यांच्यावरील जातीय राजकीय व्दोषापोटी काही राजकीय मंडळीने विनाकारण त्यांना खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकवण्याचं षडयंत्र सुरू केले आहे. त्यांच्यावरील खोटे गुन्हे मागे घ्यावेत अन्यथा खोट्या गुन्ह्याच्या निषेधार्थ काल शनिवार दि. १४ डिसेंबर २०२४ रोजी वडवणी बंदठेवण्यात आली होती. व निषेध रॅली ची सुरुवात चाटे चौक वडवणी येथून सकाळी १०:०० वाजता सुरुवात झाली व ११:३० वाजता वडवणी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रॅली समाप्त झाली. यावेळी वडवणी नगरपंचायतचे माजी नगरसेवक सतीश बप्पा बडे तसेच युवा नेते संजय भाऊ आंधळे, भास्कर मुंडे, गोरख पवार, विकास आडे, रमेश काका मुंडे, उत्तरेश्वर कागणे आदींनी वडवणी तहसीलदारांना व पोलीस यांना निवेदन दिले.

निवडणुका बॅलेट पेपरवर घ्या-खा.रजनीताई पाटील

काँग्रेस आगामी निवडणुका स्वबळावर लढणार

केज, दि. १४ (मराठवाडा पत्र न्युज):- विधानसभा निवडणुका नुकत्याच संपल्या व या निवडणुकीचे निकाल अनपेक्षित आल्याने निवडणुका खरच लोकशाही पद्धतीने होत आहेत का? असा प्रश्न काँग्रेसच्या नेत्या खा. रजनीताई पाटील यांनी बोलताना विचारला. केज येथे आयोजित करण्यात आलेल्या इव्हीएम हटाव स्वाक्षरी मोहिमेचा शुभारंभ प्रसंगी त्या बोलत होत्या या कार्यक्रमाचे अध्यक्ष बीड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून माजी मंत्री अशोक ▶▶पान २ वर

केजचे पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन सक्तीच्या रजेवर

बीड, दि. १४ (मराठवाडा पत्र न्युज) :- केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ शुक्रवारी जिल्हाभरात कडकडीत बंद पाळण्यात आला. सकल मराठा समाजाच्या वतीने पुकारलेल्या या बंदमध्ये सर्वच समाजांनी आणि राजकीय, सामाजिक संघटनांनी सहभाग नोंदविला. बीडसह इतर शहरांमध्ये सकाळी रॅली काढण्यात आली. तसेच व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवले. शाळा, ▶▶पान २ वर

ऐन हंगामात साखरेचे दर गडगडले

मुंबई, दि. १४ (वृत्तसेवा):- राज्यात उसाचा गाळप हंगाम सुरू असतानाच साखरेच्या दरात मोठी घसरण झाली आहे. साखरेचे दर प्रति क्विंटल ३३०० रुपये इतक्या निचांकी पातळीवर आले आहेत. २०१९ पासून साखरेचा किमान विक्री दर ३१०० रुपयांवर स्थिर आहे, दुसरीकडे उसाच्या एफआरपीत दरवर्षी वाढ केली जात आहे, त्यामुळे साखर कारखान्यांचा आर्थिक डोलारा अडचणीत आला आहे. देशभरात नोव्हेंबरपासून गळीत हंगाम सुरू झाला आहे. देशासह, राज्यात गाळपाला अपेक्षित गती आली नाही. गाळप करणाऱ्या कारखान्यांची संख्याही घटली आहे. शिवाय दिवाळीत साखरेचा प्रति क्विंटल दर ३७०० ▶▶पान २ वर

इमामपूर रोड परिसरात अवैध मुरूम उत्खननाचा सुळसुळाट; महसूल विभागाचे डोळे झाक

बीड, दि. १४ (मराठवाडा पत्र न्युज):- इमामपूर रोड आणि परिसरातील चराटा फाटा, घोडका राजुरी, काकड हिरा, तळेगाव या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अवैध मुरूम उत्खनन सुरू असून शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडाल्याचे समोर येत आहे. स्थानिकांकडून हा प्रश्न उपस्थित होत आहे की, या अवैध उत्खननाला पाठबळ कोणाचे आहे? संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद ठरत आहे.तलाठी आणि मंडळ अधिकारी हे सर्व प्रकरण गप्प राहून बघत असल्याचे आरोप होत आहेत. विचारणा केली असता, हे मुरूम उत्खनन शासकीय कामासाठी सुरू असल्याचा दावा केला जातो. मात्र, शासकीय कामासाठी महसूल बुडवून असा मुरूम उपसा होऊ शकतो का, हाच संशोधनाचा विषय बनला आहे. याआधी पोलीस प्रशासनाने तीन हायवा, एक पोकलेन आणि एक जेसीबी जप्त केली होती. मात्र, तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांनी पंचनामा करून कायदेशीर चौकटीत सोडून दिल्याची चर्चा आहे. जर उत्खनन केलेल्या क्षेत्रावर योग्य दंड आकारला गेला असता, तर मुरूम माफियांची हिंमत झाली नसती, असेही स्थानिक सांगत आहेत.शहरातून आणि पोलीस अधीक्षक कार्यालय समोरून अवैध मुरूम वाहतूक करणारे बिना नंबर हायवा खुलेआम फिरत आहेत. या वाहनांमुळे एखादी अनुचित घटना घडल्यास जबाबदार कोण असणार, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.अवैध उत्खनन रोखण्यासाठी कडक कारवाई होणे गरजेचे असून, महसूल विभाग, पोलीस प्रशासन आणि संबंधित अधिकारी यांच्या भूमिकेची चौकशी होणे अत्यावश्यक आहे. अन्यथा या भागातील नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास होऊन शासनाचा मोठा तोटा होईल हे मात्र नक्कीच..!

महसूल विभाग आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेवर प्रश्नचिन्ह..!

महसूल विभागाकडून मोठ्या प्रमाणावर रॉयल्टी बुडवली जात असून, या प्रकरणात अधिकारीही हात मोकळे ठेवून बसल्याचा आरोप होतो आहे. शासनाचा महसूल बुडाला तरी चालेल, पण आमच्या रॉयल्टीचा वाटा मिळावा, अशी अधिकाऱ्यांची मानसिकता असल्याचीही चर्चा सुरू आहे.

जनसामान्यांचे शस्त्र,दैनिक
मराठवाडा पत्र
दिनदर्शिका 2025
E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com | https://epaper.marathwadapatra.com

प्रिय वाचक / जाहिरातदार
दरवर्षी प्रमाणे याही वर्षी आम्ही दै.मराठवाडा पत्र नवीन वर्षानिमित्त दर्जेदार दिनदर्शिका-2025 प्रकाशित करणार आहोत. ही दिनदर्शिका महाराष्ट्रातील घराघरात जाणार आहे. तरी आपण आपली वैयक्तिक फर्म, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था, एजन्सी, वाढदिवस, उद्योगधंदे, व्यवसाय यांची जाहिरात देऊन सहकार्य करावे ही विनंती.

जाहिरात दरपत्रक
15000/-
10000/-
7000/-
5000/-
दिनदर्शिका 2025

संपादक : श्री.दत्तात्रय नरनाळे मो. 9822152955

जिल्हाप्रमुख मुळूक,गलधर यांनी केले देशमुख कुटुंबीयांचे सांत्वन

स्व.संतोष देशमुख कुटुंबीयांच्या लढाईत शिवसेना कायम सोबत-मुळूक,गलधर

बीड, दि. १४ (मराठवाडा पत्र न्युज):- केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून अत्यंत निर्दयीपणे हत्या केल्याची दुर्दैवी घटना चार दिवसांपूर्वी घडली. या घटनेचे बीड जिल्ह्यातच नाही तर राज्यभर पडसाद उमटले. जिल्ह्यातील जनतेने या घटनेचा तीव्र निषेध केला. दरम्यान शनिवारी (दि.१४) शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांनी मस्साजोग येथे संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. देशमुख कुटुंबियांच्या लढाईत शिवसेना कायम सोबत असल्याचे सांगून जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि स्वप्निल गलधर यांनी देशमुख कुटुंबियांचे सांत्वन केले. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे सोमवारी दुपारी अपहरण करुन हत्या करण्यात आली. घटनेनंतर देशमुख यांच्या हत्येचे जिल्हयात तीव्र पडसाद उमटले. या प्रकरणातील आरोपींच्या अटकेसाठी नऊ तास रास्तारोको करण्यात आला. मानवी संवेदना हेलावून टाकणाऱ्या या घटनेचा विविध स्तरातून तीव्र निषेध करण्यात आला. दरम्यान शनिवारी शिवसेना ▶▶पान २ वर

दक्षिणेतला दिग्विजयी

कोणत्याही खेळाप्रमाणे बुद्धिबळातही जगज्जेतेपद मिळवणे सोपे नाही. आजवर दीडेक डझन खेळाडूंनाच ते जमले. त्यात पुरुषांमध्ये १८व्या वर्षी निर्विवाद जगज्जेतेपद ही तर आणखी दुर्मीळ बाब. भारताच्या दोम्माराजू गुकेशने ही अपूर्वाई साधली आणि मूळ भारतीय म्हणवला जाणाऱ्या या खेळाची पाळेमुळे या भूमीत खऱ्या अर्थाने रुजली असल्याची प्रचीती आणून दिली. विश्वनाथन आनंद हा भारताचा पहिला जगज्जेता. त्याचे साम्राज्य खालसा झाल्यानंतर ११ वर्षांनीच गुकेशने जगज्जेतेपद पटकावले. हे सगळे इतक्या लवकर घडून येऊ शकते, याची खात्री फारच थोड्यांना असावी. या थोडक्यांमध्ये स्वत: गुकेश होता हे महत्त्वाचे. दोम्माराजू गुकेश बुद्धिबळ जगज्जेतेपदाच्या लढतीत तोपर्यंत जगज्जेता असलेला चीनचा प्रतिस्पर्धी डिंग लिरेनपेक्षा गुणांकनाच्या बाबतीत सरस होता. तरीदेखील अशा लढतींची स्वत:ची अशी वैशिष्ट्ये असतात. या लढतींमध्ये खेळण्याचा अनुभव अनेकदा गुणांकन किंवा इतर निकषांपेक्षा सरस ठरू शकतो. तो डिंग लिरेनकडे होता. डिंग लिरेन गेल्या वर्षी जगज्जेता बनला. कारण त्याच्या आधीच्या वर्षी नॉर्वेच्या मॅग्नस कार्लसनने पारंपरिक प्रकारात जगज्जेतेपदाच्या लढतींमधून 'निवृत्ती' जाहीर केली. त्याच्यासारख्या अपराजित आणि प्रतिभावान खेळाडूच्या माघारीमुळे बुद्धिबळविश्वात पोकळी निर्माण झालीच, तरी चुरसही वाढली. याचा फायदा घेणाऱ्यांमध्ये डिंग सर्वश्रेष्ठ ठरला. हा आणखी काही काळ जगज्जेतेपदावर राहू शकेल असे त्याच्याविषयी बोलले गेले. एरवी चिनी मंडळी ही मानसिकदृष्ट्या कणखर आणि भावनातीत थंड व्यवहारवादी मानली जातात. डिंग लिरेन अपवाद ठरला. उच्च स्तरावरील बुद्धिबळामध्ये सातत्याने चमकत राहण्यासाठी प्रचंड तयारीत राहावे लागते, मानसिक आणि शारीरिक ताणतणाव झेलावा लागतो. 'जगज्जेत्या'कडून त्या प्रमाणात अपेक्षाही वाढलेल्या असतात. त्या अपेक्षांचे, तयारीचे, ताणाचे ओझे लिरेनला पेलवले नाही. जवळपास नऊ महिने तो सर्व प्रकारच्या बुद्धिबळापासून दूर होता. मानसिकदृष्ट्या कोलमडला होता. त्याच्या अवस्थेबद्दल त्याचे प्रतिस्पर्धीही त्याची कीव करू लागले होते. कार्लसनच्या मते, लिरेन जगज्जेतेपदाची लढत खेळूच शकणार नाही इतका कोसळला होता. त्यातून डिंग सावरला, खेळला. इतकेच नव्हे तर गुकेशला तोडीस तोड ठरला. तरीदेखील त्याच्या तुलनेत गुकेशमध्ये अधिक ऊर्जा आणि ईर्षा दिसून आली हे नाकारता येत नाही. अखेरच्या टप्प्यात ही गुणद्वयीच निर्णायक ठरली. त्याची डिंग लिरेनविरुद्धची लढत सध्या चर्चेत आहे. पण जगज्जेतेपद हा गुकेशच्या प्रदीर्घ वाटचालीतला केवळ एक टप्पा आहे. ते शिखरही नव्हे. खुद्द गुकेशला याची पुरेपूर जाणीव आहे. या वाटचालीचा धांडोळा घेणे आवश्यक. वर्षभर गुकेश उच्च दर्जाचे बुद्धिबळ खेळत आहे. त्याच्यासह तिघा प्रतिभावान भारतीय युवकांची चर्चा जगभर होते. आर. प्रज्ञानंद आणि अर्जुन एरिगेसी हे इतर दोघे. प्रत्येकाचे स्वतंत्र वैशिष्ट्य. प्रज्ञानंदने इतर दोघांपेक्षा कार्लसनला अधिक वेळा हरवून दाखवले आहे. अर्जुन इतर दोघांच्या आधी २८०० एलो गुणांच्या अत्युच्च पातळीवर जाऊन पोहोचला आहे. भारताचा विश्वनाथन आनंद आणि आणखी १४ बुद्धिबळपटूंनाच हे जमू शकले. या दोघांपेक्षा गुकेश लहान. तरीही गेली चार वर्षे तो जी परिपक्वता आणि तयारी दाखवत आहे, ते पाहिल्यावर 'हाच खरा आनंदचा वारसदार' असे कार्लसनसह अनेकांनी बोलून दाखवले होते. त्याचा जन्म उच्चशिक्षितांपोटी झाला, तरी दोन्ही पालकांना गुकेशसाठी सुरुवातीस खस्ता खाव्या लागल्या. १२व्या वर्षी तो ग्रँडमास्टर बनला. त्यानंतर जवळपास प्रत्येक वर्षी नवनवीन शिखरे तो सर करत आहे. मध्यंतरी कोविडमुळे सदेह बुद्धिबळ स्पर्धा जवळपास थांबल्या आणि ऑनलाइन स्पर्धांचे युग सुरू झाले. अनेक बुद्धिबळपटूंनी या काळात नशीब काढले. काहींनी पारंपरिक प्रकाराला सोडून अशा दूरस्थ बुद्धिबळातच कारकीर्द घडवण्याचा निर्णय घेतला. त्या वाटेने गुकेश फारसा गेला नाही. हे त्याला कोणी सांगितल्याची शक्यता कमी. कारण अल्प वयात गुकेश पोक्तांना लाजवेल इतका एकल निश्चयी आणि एकाग्र बनला. आपले लक्ष्य केवळ बुद्धिबळ जगज्जेतेपदच, हे तो खूप आधीपासून सांगू लागला. काहींना त्याच्या वक्तव्यात युवासुलभ उत्साह दिसला, तर काहींना त्या वयास साजेसे भानरहित अज्ञान. पुढे कोविडोत्तर सारे काही मार्गी लागल्यावर स्पर्धा होऊ लागल्या. त्या वेळी कार्लसनसकट अनेक आघाडीच्या बुद्धिबळपटूंना गुकेश त्याच्या वयापेक्षा किती तरी अधिक परिपक्व आणि स्थिरचित्त भासला. १६ व्या वर्षी तो २७०० गुणांच्या पलीकडे सरकला. १७ व्या वर्षी २७५० गुणांच्या टप्प्याला ओलांडणारा सर्वांत युवा बुद्धिबळपटू ठरला. पुढे १७ व्या वर्षीच कँडिडेट, १७ व्या वर्षीच आव्हानवीर आणि आता १८ व्या वर्षी जगज्जेता. तिन्ही टप्पे नवा विक्रम प्रस्थापित करणारे. हे केवळ नशिबाने मिळत नाही आणि इतक्या प्रमाणात तर नाहीच नाही. त्यामागे साधना, आत्मविश्वास आणि निष्ठा असावी लागते. विश्वनाथन आनंदने गेली चार वर्षे त्याला काही प्रमाणात प्रशिक्षण देण्याची जबाबदारी उचलली. आनंदचा तो शिष्योत्तम ठरला यात आश्चर्य नाही. परवा अखेरचा डाव जिंकतो आहे याची जाणीव झाल्यानंतर गुकेशच्या चेहऱ्यावर टीनएजरला साजेसे हसू उमटले. पहिल्यांदाच. प्रत्यक्ष जगज्जेतेपद हाती आल्यानंतर भावनांचा बांध फुटला. पहिल्यांदाच. निर्जीव सोंगट्या आणि भावनाशून्य कम्प्युटरच्या संगतीत तासन्? तास घालवूनही भावना बोथट झालेल्या नाहीत याचे त्याने अनाहूत घडवलेले दर्शन सुखावहच होते. अश्रुपात होत असताना सोंगट्या पुन्हा जागेवर रचून ठेवणे किंवा विजयवीराच्या पत्रकार परिषदेत सुरुवातीस आवर्जून प्रतिस्पर्ध्याचा उल्लेख करून त्यास गौरवणे या बाबींचे कुठे प्रशिक्षण मिळू शकत नाही. ही नम्रता श्रेष्ठत्वाच्या दंभापेक्षा किती तरी पट अधिक आचरावी अशीच. कदाचित, गुकेशच्या प्रत्यक्ष खेळापेक्षा असे क्षण त्याची उंची अधिक वाढवणारे ठरतात! कार्लसनने निवृत्ती घेताना पुरेसे सक्षम प्रतिस्पर्धी गवसत नाहीत, असे कारण दिले होते. ते बहुधा अर्धसत्य असावे. गुकेश, अर्जुन, प्रज्ञानंद आणि इतरही काही षोडशवर्षीय किंवा विशीच्या उंबरठ्यावर असलेल्या काहींची प्रतिभा इतकी खाशी आहे, की त्यांच्यासमोर नजीकच्या भविष्यात निभाव लागणार नाही याची खात्री कार्लसनला वाटत असावी. पटावर पराभूत होण्यापेक्षा अशी माघार केव्हाही श्रेयस्कर, असा विचार यामागे असू शकतो. भारताचा पहिला जगज्जेता आनंद दक्षिणेतला. आता दुसरा जगज्जेताही तिथलाच. आजघडीला सर्वाधिक बुद्धिबळ ग्रँडमास्टर एकट्या तमिळनाडूतले. या खेळात मराठी पाऊल सुरुवातीस पुढे होते. पहिल्या पाचातले दोन ग्रँडमास्टर मराठी होते. महिलांमध्ये पहिली आंतरराष्ट्रीय मास्टर मराठी होती. हे चित्र पुढे बदलले. इतके, की आज तमिळनाडू आणि आंध्र प्रदेश/ तेलंगणातील बुद्धिबळपटूंच्या दर्जाविषयी आंतरराष्ट्रीय माध्यमांमधून लिहिले जाते. कारण एका टप्प्यानंतर भूमिभूत गुणवत्तेला घडवावे लागते, पाठबळ द्यावे लागते. आमच्याकडे प्रतिभावंतांनाही, आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निघताना पैसे कसे जोडावे ही भ्रांत. महाराष्ट्रात एरवी राजकीय कारणांसाठी कोट्यवधींची उलाढाल होते. पण एखाद्या खेळाडूसाठी कोटभर द्यावे लागले, तरी चालढकल होते. दक्षिणचेच कशाला, पण वर हरयाणा, पंजाब, उत्तराखंड, मणिपूर, ओदिशा या राज्यांनीही खेळ आणि खेळाडूंवर लक्ष केंद्रित करताना थैल्या सैल सोडल्या. शिवाय हे सारे पक्षातीत असते. आम्ही इतरांचे बघतो मग निर्णय घेतो. त्यामुळे इतर अनेक क्षेत्रांप्रमाणेच, ऐतिहासिकदृष्ट्या आघाडीवर असूनही दिशा, दृष्टी आणि दानत यांच्याअभावी आमची क्रीडा संस्कृती भरकटू लागली नि क्रीडापटू वाऱ्यावर सोडले गेले. गुकेशचे पोटभर कौतुक करताना, तो दक्षिणेत जन्माला आला याबद्दल त्याचा हेवा करण्याचा मोह आवरत नाही.

अखेर आ.नमिता मुंदडा यांच्यामुळे कैकाडी समाजाला मिळाली स्मशानभूमीसाठी १५ गुंठे जागा

आ.नमिताताई मुंदडा यांचे कैकाडी समाजाने मानले आभार

अंबाजोगाई, दि. १४ (मराठवाडा पत्र न्युज):- मागील अनेक वर्षांपासून प्रलंबीत असलेला अंबाजोगाईतील कैकाडी समाज स्मशानभूमीचा प्रश्न अखेर आ.सौ.नमिता अक्षय मुंदडा यांच्यामुळे मार्गी लागला आहे. याबाबत अधिकृत माहिती अखिल भारतीय कैकाडी महासंघाचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष रमेश कोंडीराम जाधव यांनी दिली आहे. याबद्दल कैकाडी समाजाकडून आ.मुंदडा यांचे जाहीर आभार मानण्यात येत आहेत. याबाबत अखिल भारतीय कैकाडी महासंघाचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष रमेश कोंडीराम जाधव यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिलेल्या माहितीनुसार सांगितले की, मागील अनेक वर्षांपासून कैकाडी समाजाच्या स्मशानभूमीचा प्रश्न प्रलंबित होता, ऊन, वारा, पाऊस यांचा सामना करीत कैकाडी समाजातील बांधवांना समाजाच्या ताब्यातील उघड्या व अपुऱ्या जागेवर पिढ्यान्? पिढ्या अंत्यविधी करावा लागत होता, या बाबत अखिल भारतीय कैकाडी महासंघाचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष रमेश जाधव यांनी कैकाडी

समाजातील इतर बांधवांसह सर्वजणांनी मिळून केज विधानसभा मतदारसंघाच्या लोकप्रिय आ.नमिताताई मुंदडा, जेष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा यांना प्रत्यक्ष भेटून याप्रश्नी त्यांनी स्वतः लक्ष देण्याची विनंती केली असता, या सर्व मान्यवरांकडून आम्हाला सकारात्मक प्रतिसाद मिळाला. याविषयी कैकाडी समाजाचे युवक कार्यकर्ते तथा मी अखिल भारतीय कैकाडी महासंघाचा अंबाजोगाई तालुकाध्यक्ष रमेश जाधव व समाज बांधवांनी १५ गुंठे जागा उपलब्ध व्हावी यासाठी काकाजींच्या मार्गदर्शनानुसार ११ मार्च २०२४ रोजी अर्ज देवून सदरचा प्रस्ताव तयार करण्यासाठी मुख्याधिकारी, तहसीलदार, उपजिल्हाधिकारी व उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाकडे सातत्यपूर्ण प्रयत्न व पाठपुरावा केला. तर आ.मुंदडा यांनी ही शासन दरबारी वेळोवेळी हा प्रश्न मांडला आणि सदर प्रस्तावाबाबत सकारात्मक पाठपुरावा करून रेणुकामाता मंदिर रोड जवळील अंबाजोगाई येथील कैकाडी समाजाच्या ''स्मशानभूमी'' साठी सर्व्हे नंबर ६२१/३ मधील १५ गुंठे जागा शासकीय गायरानातून उपलब्ध करून दिली. अखेर मुंदडा कुटुंबियांनी कैकाडी समाजाला दिलेला शब्द खरा व पुर्ण केला. त्यामुळे अत्यंत आवश्यक असलेल्या कैकाडी समाज स्मशानभूमीचा प्रश्न अखेर मार्गी लावल्याबद्दल कैकाडी समाजाकडून अखिल भारतीय कैकाडी महासंघाचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष रमेश जाधव यांनी केज विधानसभा मतदारसंघाच्या लोकप्रिय आ.नमिताताई मुंदडा, जेष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा यांचे तसेच शासन, प्रशासन, प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे जाहीर आभार मानले आहेत.

''एकनाथ शिंदे आणि 'या' दोन नेत्यांना मंत्रिमंडळात घेऊ नका''

मुंबई, दि. १४ (वृत्तसेवा):- राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झालं. मात्र, अजूनही मंत्रिमंडळाचा विस्तार झालेला नाही. १५ डिसेंबर रोजी मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यात येणार असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे भाजपा, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाला किती आणि कोणते खाते मिळते? याकडे अनेकांचं लक्ष लागलं आहे. यातच कोणत्या मंत्र्यांला कोणतं खातं मिळणार? हे देखील मंत्रिमंडळाच्या विस्तारानंतर स्पष्ट होईल. दरम्यान, यावरून आता शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मोठी मागणी केली आहे. आज पत्रकार परिषद घेत आदित्य ठाकरे यांनी मुंबईतील रस्ता घोटाळ्याच्या संदर्भातील विषयावर भाष्य केलं. यावरून त्यांनी भाजपावर हल्लाबोल केला. तसेच देवेंद्र फडणवीस यांना स्वच्छ सरकार चालवायचं असेल तर एकनाथ शिंदे, दीपक केसरकर आणि मंगलप्रभात लोढा यांना मंत्रिमंडळातून बाजूला ठेवा असं आदित्य ठाकरे यांनी म्हटलं आहे. दादरमधील हनुमान मंदिर हटवण्याच्या निर्णयाला रेल्वे प्रशासनाकडून स्थगिती देण्यात आल्याची माहिती

समोर आली आहे. याबाबत बोलताना आदित्य ठाकरे यांनी म्हटलं की, ''ही स्थगिती घाईने दिलेली आहे. मात्र, यावरून भारतीय जनता पार्टीचं हिंदुत्व हे नकली असल्याचं दिसून आलं. तसेच भाजपाचं हिंदुत्व हे निवडणुकीपुरतं असतं. निवडणुकीत हिंदुंना पुढे केलं जातं. मात्र, निवडणुका झाल्या की यांच्याच राज्यात हिंदू सुरक्षित नसतात'', असा हल्लाबोल आदित्य ठाकरेंनी भाजपावर केला. मुंबईतील रस्ता घोटाळ्याच्या आरोप करत आदित्य ठाकरे यांनी म्हटलं की, ''गेले दोन वर्ष आम्ही रस्त्याच्या घोटाळ्यासंदर्भात आवाज उठवत आलोत. २०२२, २०२३ आणि २०२४ मध्ये रस्त्याचा ६ हजार कोटींचा घोटाळा लोकांसमोर आणला.

आधुनिक शेतीतील यांत्रिकीकरणात कौशल्याला विशेष महत्व-डॉ.इंद्र मणि

अंबाजोगाई, दि. १४ (मराठवाडा पत्र न्युज):- दीनदयाल शोध संस्था कृषी विज्ञान केंद्र अंबाजोगाई व वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने सीएनएच इंडस्ट्रीयल (न्यू हॉलंड) इंडिया, नवी दील्ली यांच्या व्यावसायिक सामाजिक जबाबदारीच्या माध्यमातुन ग्रामीण युवक व शेतकरी यांच्यासाठी ट्रॅक्टर व अवजारे वापर कौशल्य विषयक तीन दिवसीय प्रशिक्षण दि. १२ ते १४ डिसेंबर २०२४ दरम्यान कृषी विज्ञान केंद्र डीघोळअंबा येथे आयोजित करण्यात आला आहे. दि. १२ डिसेंबर २०२४ रोजी प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षस्थानी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणीचे कुलगूरु डॉ. प्रा. इंद्र मणि हे ऑनलाईन पद्धतीने उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणुन डॉ. भगवान आसेवार (संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता, वनामकृवि, परभणी) आणि डॉ. उदय खोडके (नोडल अधिकारी, सीएनएच प्रकल्प, वनामकृवि, परभणी) हे लाभले तसेच कृषी विज्ञान केंद्राचे वरीष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. वसंत देशमुख, कृषी अभियंता प्रमोद रेणापुरकर हे उपस्थित होते. कृषी मधील मजुराची अनुपलब्धता व त्यामुळे होणारे नुकसान या बाबत माहिती देवून शेती मधील कामे वेळेवर पूर्ण होण्यासाठी यांत्रिकीकरण आवश्यक असल्याचे आपल्या प्रास्ताविक पर भाषणात डॉ. वसंत देशमुख यांनी सांगितले. केंद्रातर्फे जिल्ह्यातील १०० ग्रामीण युवक व शेतकऱ्यांना हे प्रशिक्षण देत असल्याचे सांगुन बेरोजगारांना रोजगार निर्मितीसाठी हे मदतकारक ठरत असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. उदय खोडके यांनी वनामकृवि-सीएनएचआय प्रकल्पाची माहिती दिली. काटेकोर शेती साठी यांत्रिकीकरण फायदेशीर ठरत असल्याचे सांगुन यांत्रिकी शेती पद्धतीमध्ये उत्पादन खर्च कमी होत असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. भगवान आसेवार यांनी सदरील प्रशिक्षण वर्गाचे महत्व सांगुन प्रशिक्षणार्थींना भविष्यात कौशल्य आधिरीत रोजगार निर्माण होणार असल्याचे सांगितले. तेसच जास्तीत जास्त बेरोजगार तरुन व नवयुवक यांनी प्रशिक्षणाचा लाभ घेउन कौशल्य आधारित व्यवसाय सुरु करावा असे सुचविले. अध्यक्षीय समारोपानंतर तांत्रीक सत्रात डॉ. स्मिता सोळंके (कृषीयंत्र व शक्ती विभाग, वनामकृवि, परभणी) यांनी विद्यापीठ विकसीत विविध बैल चलित तसेच ट्रॅक्टरचलित औजारांची माहिती दिली. पेरणी दरम्यान विशेषतः रुंद वरंबा सरी टोकण यंत्राची जोडणी बाबत चालकाच्या अडचणी वरील उपाय योजना सांगण्यात आल्या. प्रशिक्षणाच्या दुसऱ्या सत्रात कृषी अभियंता प्रमोद रेणापूरकर यांनी ट्रॅक्टर मध्ये प्रती सेकंद एक थेंब गळती प्रती वर्ष २००० लिटर्स पर्यंत डिझेल वाया घालवते असे सांगुन निष्क्रीयपणे चालू असलेला ट्रॅक्टर प्रती तास १ लिटर हून अधिक डीजेल वाया घालवितो असे सांगितले.

पान १ वरून

उद्या काही स्फोट...

उपस्थित केला. ''मी पूर्णपणे ग्रामस्थांबरोबर आहे, जो ग्रामस्थ निर्णय घेतली त्याबरोबर संभाजीराजे असतील'', असेही त्यांनी यावेळी जाहीर केले. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर राज्यभरातून संताप व्यक्त केला जात आहे. मस्साजोग गावतील नागरिकांकडून आक्रमक पवित्रा घेत आंदोलन केले जात आहे. गावकऱ्यांकडून आरोपांना तातडीने अटक करण्याची मागणी केली जात आहे. तसेच या संपूर्ण प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी करण्याची मागणी देखील गावकरी करत आहेत. यानंतर बीडचे पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी मान्य करत गावकऱ्यांना आश्वासन दिले आहे. संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणात पोलीस ठाण्यात सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तर अद्याप दोन जणांना अटक करण्यात आली आहे. ६ डिसेंबर रोजी मस्साजोग येथे अवादा पवन ऊर्जा या पवनचक्की प्रकल्पाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याची घटना घडली होती. त्या प्रकल्पावर सुरक्षा रक्षक म्हणून काम करणारे सुरक्षा रक्षक हे मस्साजोग येथील असल्याने सरपंच संतोष देशमुख यांनी प्रकरणात हस्तक्षेप केला आणि मारहाण करणार्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. त्याचा राग मनात धरून अपहरणकर्त्यांनी त्यांचा खून केल्याचा आरोप होत आहे.

लिंबागणेश जि.प....

शनिवार (दि.१४) रोजी या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ आ.संदीप क्षीरसागर यांनी केला. या कामाला लवकरच प्रत्यक्ष सुरूवात करण्यात येणार आहे. या विकासकाम शुभारंभ प्रसंगी माजी आ.सय्यद सलीम, राजेंद्र मस्के, परमेश्वर सातपुते, गणेश वरेकर, वैजनाथ नाना तांदळे, गोरख शिंगण, बाळासाहेब गोरे यांच्यासह जिल्हा परिषदेच्या संबंधित विभागाचे अधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवडणूका बॅलेट...

पाटील हे होते. ईव्हीएम हटाओ देश बचाओ, संविधान बचाओ हे अभियान भारतीय काँग्रेस पक्षाने सुरू केले असून या अभियानाची सुरुवात बीड जिल्हयात करण्यात आली याचा शुभारंभ केज येथे करण्यात आला बोलताना खा. रजनीताई पाटील यांनी सांगितले की देशात व विशेषतः महाराष्ट्रात महायुतीच्या

पान १ वरून

विरोधात जनतेचा कौल होता, जनभावना विरोधात होती अनेक पोल देखील महायुतीच्या विरुद्ध होते तरीही यापूर्वी कधीही मिळाल्या नाही येवढ्या मोठ्या प्रमाणात जागा भाजप व मित्र पक्षाच्या येतात याचा अर्थ इव्हीएम्? मद्ये काहीतरी गडबड आहे आणि म्हणून काँग्रेस पक्षाने हे अभियान सुरू केले आहे. येणारा काळ काँग्रेस पक्षचा आहे त्यामुळे सर्वसामान्य लोकांसाठी कामे करा यापुढच्या निवडणुका आता आपल्या कार्यकर्त्यांसह व त्यांच्यासाठीच लढायच्या आहेत प्रत्येक वेळी आपल्यावर जागा वाटपात अन्याय होतो मात्र आता आपण आपल्याच चिन्हावर या निवडणुका लढणार असल्याचे रजनीताई पाटील यांनी सांगितले. यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी देखील या अभियानाची सुरुवात खा.रजनीताई पाटील यांच्या स्वाक्षरीने सुरुवात करून केली तर यापुढे प्रत्येक तालुका निहाय पक्ष बांधणी करून नव्या जुण्यांचा एकत्र येवून मोठ बांधून जिल्ह्यात पक्षाला पुन्हा शिखरावर नेण्याचे काम आपण सर्वजण करू अशी भावना व्यक्त केली. यावेळी या कार्यक्रमाला आदित्य पाटील, नवनाथ थोटे, महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष मीनाक्षी पांडुळे, अनुसूचित जाती सेल चे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे, सर्व तालुका अध्यक्ष, युवक चे पदाधिकारी, महिला पदाधिकारी, अल्पसंख्यांक विभागाचे पदाधिकारी, अनुसूचित जाती सेल चे जिल्हाध्यक्ष व पदाधिकारी यांचे सह प्रमुख कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

अब मैं मैदान मे आऊंगा - अशोक पाटील

यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना अशोक पाटील यांनी आपल्या खास शैलीतून पदाधिकारी व कार्यकर्त्यांना कामाला लागण्याच्या सूचना केल्या आणि आता जिल्ह्यातील प्रत्येक निवडणूक काँग्रेस पक्ष स्वबळावर लढणार आहे त्यामुळे मी आपल्या कार्यकर्त्यांसाठी सैदव उपलब्ध असेल मला कधीही कुठेही बोलवा मी यायला तयार आहे. मोठ्या ताकतीने पक्ष संघटन करू आणि तेवढ्याच ताकतीने नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका आपण काँग्रेसच्या चिन्हावर लढू अस मत त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.

केजचे पोलीस निरीक्षक...

महाविद्यालयेही बंद ठेवली होती. दिवसभरात हा बंद शांततेत पाळला होता.

पान १ वरून

दरम्यान, या प्रकरणात आरोप असलेले केजचे पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन यांना सक्तीच्या रजेवर पाठवले आहे. त्यांचा अतिरिक्त पदभार अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे पोलिस निरीक्षक वैभव पाटील यांच्याकडे देण्यात आला आहे. आज ते पदभार स्विकारणार आहेत. विशेष म्हणजे महाजन यांच्यावर निलंबनाची कारवाईही होणार आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या केज तालुकाध्यक्ष विष्णू चाटे याच्यासह सातजणांचा सहभाग आढळला आहे. यातील तीन आरोपी पोलिसांनी पकडले आहेत. परंतु चार आरोपी अजूनही मोकाटच आहेत. तसेच या प्रकरणात पोलिसांच्या भूमिकेवरही संशय व्यक्त करण्यात आला होता. त्यामुळे पोलिस उपनिरीक्षक राजेश पाटील यांना निलंबितही करण्यात आले होते. असे असले तरी या घटनेमुळे सर्वत्र संताप व्यक्त केला जात होता. कायदा व सुव्यवस्थेबद्दल प्रश्न उपस्थित केले जात आहेत. याच घटनेच्या निषेधार्थ आणि या प्रकरणातील फरार आरोपींना अटक करावी, या प्रकरणाचा मागचा मास्टरमाईंड शोधावा, यातील आरोपींना कठोर शासन करावे, हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावे यांसारख्या विविध मागण्यांसाठी शुक्रवारी जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती. याला जिल्ह्यात सर्वत्र प्रतिसाद मिळाला. नागरिकांतील वाढता रोष पाहून आणि आंदोलकांना दिलेले आश्वासन पूर्ण करत पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन यांना सक्तीच्या रजेवर पाठवले आहे. तसेच चोकशी पूर्ण होताच महाजन यांना निलंबित ही केले जाणार आहे, आता केजची जबाबदारी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे पोलिस निरीक्षक वैभव पाटील यांच्याकडे देण्यात आली आहे. मुळचे कोल्हापुरचे रहिवाशी असलेल्या पाटील यांनी सीआयडी पुणे, अकोला आदी ठिकाणी कर्तव्य बजावलेले आहे.

ऐन हंगामात साखरेचे...

रुपयांवर गेला होता. दिवाळीपासून आजघडीला साखरेच्या दरात प्रति क्विंटल ४०० रुपयांपर्यंत घट झाली आहे, सध्या साखरेचा दर दर्जानिहाय प्रति क्विंटल ३२५० ते ३३०० रुपयांवर आला आहे. यापूर्वी जून २०२३ मध्ये साखरेचे दर ३३०० रुपयांपर्यंत खाली आले होते. हंगामात साखरेला चांगला दर मिळाला तर कारखानदार साखर विकून उसाचा रास्त आणि किफायतशीर

पान १ वरून

दर (एफआरपी) देतात. पण, साखरेचे दर पडले तर साखर गोदामांमध्ये साठवून ठेवावी लागते. त्यामुळे साठवणुकीचा खर्च वाढतो आणि कारखान्यांकडे खेळते भांडवलही राहत नाही. थंडीच्या दिवसांत आईस्क्रीम, शीतपेयांची मागणी घटते. सध्या सण उत्सवही नाहीत, या सर्वांचा थेट परिणाम म्हणून साखरेची मागणी घटते. दरात पडझड होते. दिवाळीत साखरेचे दर ३७०० रुपये प्रति क्विंटलवर गेल्यानंतर केंद्र सरकारकडून बाजारात साखरेचा पुरवठा वाढविण्यासाठी काखान्यांना जास्त कोटा दिला होता. महिन्याला सरासरी देशाला २२ लाख टन साखर पुरते. दिवाळीमुळे केंद्र सरकारने ऑक्टोबर महिन्यात देशभरातील कारखान्यांना २५ लाख टन साखर बाजारात विकण्यास परवानगी (कोटा) दिली होती. पण, अतिरिक्त साखरेची विक्री झाली नाही. कारखान्यांकडे साखर पडून राहिली. नोव्हेंबर महिन्यात २२ लाख टनांचा कोटा दिला आहे, तरीही बाजारातून मागणी नसल्याची स्थिती आहे.

जिल्हाप्रुख मुळूक, गलधर...

जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि स्वप्निल गलधर यांच्यासह शिवसैनिकांनी मस्साजोग येथे जाऊन देशमुख कुटुंबियांची भेट घेतली. यावेळी सरपंच स्वर्गीय संतोष देशमुख यांना श्रद्धांजली वाहिली. त्यांचे बंधू धनंजय देशमुख यांची भेट घेऊन देशमुख कुटुंबिया सोबत शिवसेना कायम सोबत असल्याचे सांगितले. शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे या खून प्रकरणाचा तपास सीआयीडी मार्फत करावा अशी मागणी केली होती त्यानुसार या प्रकरणाचा तपास सीआयडी कडे देण्यात आला आहे स्वतः उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणात लक्ष घातल्याचे मुळुक यांनी यावेळी सांगितले. यावेळी केज युवा सेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे, शिवसेना तालुकाप्रमुख अण्णासाहेब पाटील, विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाने, शहर प्रमुख बाळासाहेब पवार, युवा सेना तालुकाप्रमुख सुग्रीव सक्राते, विकास काशीद केज तालुका सचिव, उपतालुकाप्रमुख महेंद्र चाटे, चंद्रकांत इंगळे, विभाग प्रमुख दत्ता काकडे, युवासेना शहरप्रमुख आकाश चाळक, विभाग प्रमुख आकाश बहीर, शिवाजी गायकवाड, युवासेना उपतालुकाप्रमुख अजित गोरे, सरपंच बनसारोळा मनोहर गोरे सह शिवसेनेचे सर्व पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

थोडक्यात

कै. रामदास दशरथ यमपुरे यांच्या चौथे पुण्यस्मरण निमित्त बबन महाराज मंझेरीकरांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी

रामदास दशरथ यमपुरे यांच्या चौथ्या पुण्यतिथी निमित्त बीड तालुक्यातील उदंड वडगाव येथे बबन महाराज मंझेरीकर यांचे सोमवार दि.१६ डिसेंबर रोजी रात्री ८ ते १० या वेळेत कीर्तन होणार आहे. त्यानंतर रात्री १० ते १२ या वेळेत खुळे महाराज यांचे भारूड होणार आहे. उदंड वडगाव शिवाजीनगर येथे रामदास दशरथ यमपुरे यांच्या पुण्यतिथी निमित्त कीर्तन अन् भारूडाचा कार्यक्रम दरवर्षी आयोजित करण्यात येत आहे. यंदा चौथ्या पुण्यतिथी निमित्त १६ डिसेंबर रोजी कीर्तन अन् भारूड होणार आहे. तरी या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन शहाजी रामदास यमपुरे, धनंजय रामदास यमपुरे, चंद्रकांत रामदास यमपुरे व समस्त यमपुरे परिवार यांनी केले आहे.

गिरजा आप्पा पिराजी मस्के यांचे निधन; सामाजिक कार्यकर्ते सुनील मस्के यांना पितृशोक

परळी । प्रतिनिधी

परळी वैजनाथ साठेनगर येथील सामाजिक कार्यकर्ते सुनील मस्के यांचे वडील गिरजा आप्पा पिराजी मस्के यांचे आज शनिवार रात्री दोन वाजता दुःखद निधन झाले त्यांचे मृत्यू समई वय ७० वर्षे होते साठेनगर मधील एक अतिशय मनमिळाऊ सामाजिक कार्यकर्ते शाहू फुले आंबेडकर साठे विचारांचे पाईक होते ते अनेक समाज विकासाच्या कार्यक्रमात हिरारीने भाग घेत असत त्यांची शनिवारी रात्री २ वाजता अचानक प्राणज्योत मालवली आज शनिवार रोजी साठे नगर जवळील समशानभूमीत त्यांचे वर अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी असंख्य नातलग व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते गिरजा आप्पा पिराजी मस्के यांच्या पश्चात दोन मुले दोन मुली सुना नातवंडे पत्नी जावई नातू असा मोठा परिवार आहे मस्के परिवाराच्या दुःखात दैनिक मराठवाडा पत्र परिवार सहभागी आहे व त्यांचा राख सावडण्याचा विधी सोमवार दिनांक १६/१२/२०२४ रोजी सकाळी आठ वाजता होणार आहे.

डोंगरे वरील गोळीबार प्रकरणी सुत्रधार शोधून गुन्हा दाखल करा

अमर नाईकवाडे, फारुख पटेल यांची मागणी

बीड । प्रतिनिधी

शहरात गुरुवारी रात्री झालेल्या गोळीबारात प्रकरणातील फरार आरोपींचा आणि यामागील सुत्रधारांचा शोध घेऊन गुन्हे दाखल करण्याची मागणी अमर नाईकवाडे आणि फारुख पटेल यांनी पोलीस अधीक्षक यांना निवेदनाद्वारे केली आहे. मागील वैयक्तिक वादातून शहरातील पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीतील इमामपूर रोडवर डोंगरे कुटुंबावर घरात घुसून गोळीबार करण्यात आला. यामध्ये विशास डोंगरे हा तरुण गंभीर जखमी असून, त्यांच्यावर औरंगाबाद येथे उपचार सुरू आहेत. याप्रकरणी आज अमर नाईकवाडे आणि फारुख पटेल यांनी आक्रमक भूमिका घेत पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांची भेट घेऊन निवेदन दिले. यामध्ये त्यांनी या गोळीबार प्रकरणातील आरोपींची गुन्हेगारी पोर्शभूमीचा पाढा वाचला आहे. तसेच हे कोणाच्या इशाऱ्यावर काम करतात यातील मुख्य सुत्रधार कोण आहेत याचाही शोध घ्यावा आणि त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. विधानसभा निवडणुकीच्या काळातही याच आरोपींनी काहींना मारहाण केल्याचा आरोप केला आहे. याच आरोपींचा बनावट चलनातही सहभाग असल्याचे निवेदनात म्हटले आहे. या आरोपींचा आणि यांच्या मागील असलेल्या सुत्रधारांचा शोध घेऊन त्यांच्यावर गुन्हे दाखल करा अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. या निवेदनावर अमर नाईकवाडे, फारुख पटेल, बाळासाहेब गुंजाळ, प्रिया डोईफोडे यांच्यासह आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामासाठी लागणारी नोटरी मोफत करणार: ॲड. राहुल सोळंके

बीड । प्रतिनिधी

सध्याची परिस्थिती पहिली तर महागाई व बेरोगारीने सर्वच लोक त्रस्त आहेत त्यातच १०० चा बॉण्ड बंद करून पाचशे रुपयाच्या बॉण्ड ची सक्ती पुन्हा टायपिंग खर्च करून नोटरी करावी लागते ही नोटरी करण्यासाठी बाहेर असणारे ऐजंट, दलाल ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांना व अज्ञानी पालकांना स्वधार व इतर शैक्षणिक कामासाठी लागणाऱ्या नोटरी साठी आर्थिक पिळवणूक करून हजारो रुपये उकळत असल्याचे लक्षात आल्यामुळे एक सामाजिक बांधिलकी जपत गिरीबीची जाणीव असणारे माजलगाव येथील गंगामसाला या छोट्याशा गावातून बीड येथे शिक्षणासाठी आलेले व नुकतेच भारत सरकार नोटरी म्हणून नियक्त झालेले ॲड राहुल दिलीप सोळंके व ॲड अंकुश तांबे साहेब रा. तांबा राजुरी ता. बीड. यांनी विद्यार्थ्यांसाठी मोफत साधी नोटरी करण्याचा निर्णय घेतला आहे नोटरी साठी खालील नंबर वर संपर्क करा- ९८२२५३२८५३, ९९२२५३६७५३, ९३२५५३१७७६ या निर्णयाबद्दल बीड जिल्हा न्यालयातील ॲड राजेश शिंदे, ॲड तेजस वडमारे, ॲड फारुख शेख, ॲड वंदना साळवे, पत्रकार सुनिल डोंगरे, संगमेश्वर आंधळकर, मल्हारी जाधव, तसेच शहरातील व ग्रामीण भागातील सर्व विद्यार्थ्यांनी व पालकांनी त्याच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे.

श्रीक्षेत्र दत्त संस्थान कोल्हारवाडी येथे आज भव्य दत्त जन्मोत्सव सोहळा

देखन्या दत्तजन्मोत्सव सोहळ्याचे साक्षीदार व्हा: श्री ह भ प श्रीहरी महाराज पवार

बीड । प्रतिनिधी

बीड शहराजवळील श्रीक्षेत्र दत्त संस्थान कोल्हारवाडी फाटा या ठिकाणी आज रविवार दि.१५ रोजी मोठ्या थाटात दत्त जन्मोत्सव साजरा केला जाणार आहे. दत्त संस्थानचे सर्वेसर्वा श्री ह भ प श्रीहरी महाराज पवार यांनी या दत्त जन्मोत्सव सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन सर्व भाविक भक्ताला केले आहे.. सकाळी सात वाजता श्री च्या मूर्तीचां महा अभिषेक होणार आहे, तर सकाळी आठ ते दहा या वेळेत छत्रपती संभाजी चौक - मंदिर भव्य शोभायात्रा निघणार आहे.. दुपारी अकरा ते एक या वेळेत दत्त जन्माचे कीर्तन व काल्याचे किर्तन श्री ह भ प महंत संजीवन दास महाराज पाटील यांचे होईल. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप होणार आहे.. या सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन दत्त जन्मोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.. विशेष उद्या रात्री सात ते नऊ या वेळेत दत्तप्रभूंच्या पालखीचे भव्य मिरवणूक निघणार आहे या मिरवणुकीमध्येही सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे..

लिंबागणेश येथील श्रीकृष्ण मंदिरात मोठ्या उत्साहात श्रीदत्त जयंती साजरी

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील श्रीकृष्ण मंदिरात विश्वस्तांनी आज दि.१४ शनिवार रोजी दत्त जन्मोत्सव निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दत्त जयंतीला धार्मिक मान्यतेनुसार श्रीदत्तात्रेयसह लक्ष्मी नारायणाची पुजा करण्यात आली. यावेळी चौरंगावर पांढरे वस्त्र टाकुन त्यावर दत्तात्रेय महाराजांची मुर्तीची स्थापना करण्यात येऊन पंचामृताने दत्तात्रेयाचा अभिषेक करण्यात आला.धुप, दिवा, फुलं, नैवेद्य अर्पण करत आरती करण्यात आली.हिंदु धर्मात मार्गशीर्ष महिन्याला विशेष महत्त्व आहे.मार्गशीष महिन्यातील शुक्ल पक्षातील पोर्णिमेला दत्ताचा जन्म झाला म्हणून हा दिवस दत्त जयंती म्हणून साजरा केला जातो. दुपारी १२ ते १ दरम्यान महाआरती, भजन, किर्तन व दुपारी १ ते ५ पर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमासाठी बाळुकाका पाटोदकर, बंडु पाटोदकर, राजेभाऊ गिरे, विनायक वाणी, रामकिसन गिरे, सुदाम रणखांब, जयदेव गिरे, अंकुश गिरे, अर्जुन गिरे, उमेश जोगदंड आदिंनी परीश्रम घेतले.

परिशिष्ठ -4

अवसायक (खालील तपशिलाप्रमाणे)
संलग्न, सहायक निबंधक, सहकारी संस्था
ता.माजलगाव जि.बीड
दि.04 डिसेंबर, 2024.

मा.सहायक निबंधक, सहकारी संस्थाता. माजलगाव जि. बीड यांनी त्यांचे कार्यालयीन आदेशाव्दारे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 102 मधील तरतूदीन्वये खालील सहकारी संस्थेचे अंतिम आदेश निर्गमित केलेले असून त्यावर खालील तपशिलाप्रमाणे अवसायकांची नियुक्ती केलेली आहे. त्यानुषंगाने खालील सहकारी संस्थांची अवसायन कार्यवाही पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्थांचे नियम 1961 मधील नियम 89 (4) मधील तरतूदी प्रमाणे खालील सहकारी संस्थांच्या सर्वसंबधीतांना याव्दारे नोटीस देऊन कळविण्यात येते की, त्यांना संस्थेस देणे असल्यास अथवा संस्थेचे येणे असल्यास या नोटीस चे दिनांकापासून दोन (02) महीन्याच्या आत त्यांचे येणे रक्कमेबाबत हरकती / आक्षेप पुराव्यानिशी संबधीत अवसायकाकडे दाखल करावे. आणि देणे रक्कम तात्काळ संबधीत अवसायकाकडे जमा कराव्यात वरील मूदतीत संस्थेचे देणे / येणे रक्कमांचे अनुषंगाने संबधीत अवसायकाकडे पुराव्यानिशी कागदपत्रेदाखल न केल्यास संस्थेस कोणचे ही देणे नाही अथवा येणे नाही असे समजण्यात येऊन अवसायन कार्यवाही पूर्ण करण्यात येईल तसेच संस्थेच्या येणे असलेल्या रक्कमासंबधीत अवसायकाडे जमा न केल्यास त्या कायदयातील तरतूदीप्रमाणे वसूल करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी. मूदती नंतर आलेल्या आक्षेपावर विचार केला जाणार नाही.

अ.क्र.	संस्थेचेनाव	अवसायकाचे नाव	अवसायनाचा अंतिम आदेश दिनांक	घेण्यात येणाऱ्या अंतिम सभेचा दिनांक
01	क्रांती महीला नागरी सहकारी पतसंस्था म. माजलगाव	श्री एस. के. शेरखाने	30.03.2022	20.02.2025
02	सावित्री बाई फुले महीला ग्रामीण बिग रशेती सह.पतसंस्था म. ब्रम्हगांव	श्री एस.के.शेरखाने,	09.12.2022	20.02.2025
03	राजमाता जिजमाता महीला रुरल नॉन ऑग्रीको. ऑप.क्रे.सो. लि. दिंद्रुड	श्रीमती ए.डी.दळवी,	09.12.2022	20.02.2025
04	भारतरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर मागा. शासकीय कर्मचारी सह पतसंस्था म. माजलगाव	श्री एस.डी.नेहरकर,	09.12.2022	20.02.2025
05	वैद्यनाथ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था म. दिंद्रुड	श्री व्ही.एस.सावध,	09.12.2022	20.02.2025
06	जयआनंद नागरी सहकारी पतसंस्था म. माजलगाव	श्री व्ही.एस.सावध,	26.03.2024	20.02.2025
07	कानिफनाथ स्वंयरोजगार सेवा सहकारी संस्था म. माजलगाव	श्रीमती ए.डी.दळवी,	26.03.2024	20.02.2025
08	जय तुळजाभवानी अभिनव सर्वसाधारण सहकारी संस्था मर्या. माजलगांव	श्री एस.डी.नेहरकर,	26.03.2024	20.02.2025
09	शिवनेरी बहुउद्देशिय सर्व सेवा सहकारी संस्था म.माजलगाव	श्री एस.के.शेरखाने,	28.03.2024	20.02.2025
10	शिवप्रताप बहुउद्देशिय सर्वसेवा सहकारी संस्था म. माजलगाव	श्रीमती ए.डी.दळवी,	28.03.2024	20.02.2025
11	आश्रय बहुउद्देशिय सर्वसेवा सहकारी संस्था म.माजलगाव	श्रीमती ए.डी.दळवी,	28.03.2024	20.02.2025
12	बालाजी माती परिक्षण सहकारी संस्था म.दिंद्रुड	श्री एस.के.शेरखाने,	27.03.2024	20.02.2025

तसेच वरील संस्थांच्या सर्व सभासद धनको, ऋणको यांना याव्दारे असे ही सूचित करण्यात येते की, संस्थेची अवसायन कामकाजाची कार्यवाही पूर्ण करण्याच्या दृष्टीकोणातून अंतिम सभा दि. 20 फेब्रुवारी, 2025 रोजी सकाळी ठिक 11.00 वाजता सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. माजलगाव शिक्षक सहकारी पतसंस्थेचा वरचा मजला, शाहूनगर माजलगाव ता. माजलगाव जि. बीड येथे ठेवण्यात आलेली आहे. सदर सभेस संस्थांच्या सर्व सभासद, धनको, ऋणको, यांनी त्यांचे आक्षेप व पुराव्यासह हजर राहावे. सदर सभे मध्ये अवसायन कामकाजाचा अहवाल व संस्था नोंदणी रद्द करणे बाबतचा विचारविनिमय केला जाणार आहे यांची कृपया संबधीतांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-	स्वाक्षरित/-	स्वाक्षरित/-	स्वाक्षरित/-
एस.डी.नेहरकर,	**व्ही.एस.सावध,**	**एस.के.शेरखाने**	**ए.डी.दळवी**

आसरडोह ओबीसी घरकुलात मोठा भ्रष्टाचार

चौकशी करून गुन्हा दाखल करा: अन्यथा अमरण उपोषण

धारूर । प्रतिनिधी

तालुक्यातील आसरडोह येथे ओबीसी प्रवर्गातील घरकुलामध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून गावचा ग्रामसेवक पंचायत समीतीचा इंजिनियर आणि विस्तार अधिकारी यांनी संगनमत करून घरकुलांचे कसलेही बांधकाम न करता मलीदा लाटला आहे

गटविकास आधिकारी पंचायत समिती धारूर यांना दिलेल्या लेखी निवेदनात अरुण तोडकर यांनी म्हटले आहे कि, ओबीसी घरकुलांचे पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात दोन दोन हप्ते जमा झाले खरे मात्र त्यांनी कुठल्याही घरकुलाचे कसलेही बांधकाम केलेले नाही तरीही त्यांच्या खात्यात हप्ते जमा झाले कारण प्रत्येक हप्त्या पोटी लाभार्थ्याकडून पाच पाच हजार रुपये घेतल्या मुळे असरडोह येथे हा चमत्कार घडु शकला आणि सरकारी अधिकाऱ्याच्या खाबुगीरी मुळे घरकुलांचे बोगस हप्ते लाभार्थ्यांना मिळाले, ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असून ग्रामसेवक व पंचायत समितीच्या इंजिनियर व इतर आधिकाऱ्यामुळे शासनाच्या घरकुल योजना उद्देशाला काळीमा फासला गेला आहे शेकडो घरकुलात प्रतिहप्ता पाच हजार या प्रमाणे आसरडोह येथे लाखो रुपयाचा भ्रष्टाचार झाला असून या गंभीर प्रकरणाची चौकशी करून संबंधित भ्रष्ट आधिकाऱ्यावर योग्य ती उचित कारवाई करावी अन्यथा मी दि २६ जानेवारी २० २५ रोजी आत्मदहन करील असा इशारा निवेदनातून अरुण तोडकर यांनी दिला आहे असा कुठला अनुचित प्रकार घडला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी मा गटविकास आधिकारी धारूर यांची राहिल.

नवीन १४ प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी निधी उपलब्ध करुन द्या

केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधवांकडे कुंडलिक खांडेंची मागणी

बीड । प्रतिनिधी

प्राथमिक आरोग्य उपकेंद्र हे ग्रामीण भागातील अत्यंत महत्त्वपूर्ण व संवेदनशिल म्हणून ओळखले जाते. ग्रामीण भागातील लहान मोठ्या घातपातापासून तर अपघातांतील रुग्णांसह तालुक्यातील दैनंदिन ओपीडीसाठी येणार्या रुग्णांना या ठिकाणी तत्पर सेवा मिळणे गरजेचे आहे.बीड जिल्ह्यातील जनतेचे आरोग्य अधिकाधिक सुरक्षीत करण्याच्या हेतुने सध्या कार्यरत असणार्या आरोग्य उपकेंद्रांच्या संख्येत वाढ होणे गरजेचे आहे. त्यासाठी नवीन १४ आरोग्य उपकेंद्रे स्थापण्याची आवश्यकता आहे. या उपकेंद्रांच्या उभारणीसाठी प्रत्येकी १२५ लक्ष रु.ची आवश्यकता आहे. एकूण १४ उपकेंद्रांसाठी एकूण १७५० लक्ष रु.मंजुर करावेत अशी मागणी सरपंच,उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची भेट घेवून मागणी केली आहे.या प्रसंगी ना.जाधव यांनी खांडे यांनी दिलेल्या निवेदनाबद्दल आश्वस्त करताना लवकरच बीड जिल्ह्यातील नवीन १४ उपकेंद्रांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिले आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र हे भारतातील आरोग्यसेवेच्या उतरंडीतील सर्वात खालचे एकक आहे देशातील दूरवरच्या भागातील मनुष्यवस्तीपर्यंत किमान आरोग्य सुविधा पोचविण्याच्या उद्देशाने भारतातील मध्यवर्ती सरकारच्या धोरणानुसार.प्राथमिक आरोग्य केंद्रांचे जाळे विणण्यात आले आहे.

नवी दिल्ली येथे केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची भेट घेत सरपंच, उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी एका निवेदनाव्दारे बीड जिल्ह्यात नवीन १४ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांची मागणी करत त्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी केली आहे. स्थानिक उद्भवणार्या आजरांवर नियंत्रण मिळवणे, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे, महत्त्वपूर्ण आकडेवारी गोळा करणे तसेच रेफरल व प्रयोग शाळेच्या सेवा पुरवणे इ. कार्य प्राथमिक आरोग्य केंद्र पार पाडते. त्याम ुळे बीड जिल्ह्यात नवीन १४ आरोग्य उपकेंद्रे स्थापण्याची आवश्यकता आहे. या उपकेंद्रांच्या उभारणीसाठी प्रत्येकी १२५ लक्ष रु.ची आवश्यकता आहे. एकूण १४ उपकेंद्रांसाठी एकूण १७५० लक्ष रु.मंजुर करावेत अशी मागणी सरपंच,उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची भेट घेवून मागणी केली आहे.

थोडक्यात

कॅफेमध्ये अश्लील कृत्य ; कॅफे मालक अटक !

बीड शहर पोलिसांची कामगिरी

बीड । प्रतिनिधी

कॅफे फोर चे मालक विवेक सुधाकर जाधव यांनी एका अल्पवयीन मुलीला एका मुलासोबत एकांतवासात अश्लील कृत्य करण्यास बसू दिले. या प्रकरणाची खातरजमा करण्यात आली आणि व्हिडिओ शूटिंग पण करण्यात आली. यामुळे रितसर तक्रार नोंदवून यातील तो मुलगा आणि कॅफे मालक विवेक सुधाकर जाधव, राहणार संत नामदेव नगर, बीड यास अटक करण्यात आली आहे. त्यांच्यावर बाल लैंगिक अत्याचार कायदा याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच फिर्याद मध्ये असा पण उल्लेख आहे की , इतरही कॅफेवर अशा प्रकारचे अश्लील कृत्याला परवानगी देण्यात येत असते. यामुळे शहरातील सर्व कॅफे आता या गुन्ह्याच्या तपासात अंतर्भूत झाली असून ज्या कॅफेमध्ये अशा प्रकारचे आक्षेपार्य जोडपे सापडतील त्यांच्यावर बाल लैंगिक अत्याचार कायद्याप्रमाणे कडक कारवाई करण्यात येणार आहे. सदरील कारवाई, श्री. अविनाश बारगळ, पोलीस अधीक्षक बीड, अपर पोलीस अधीक्षक बीड श्री सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. विश्वांबर गोल्डे, बीड, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ , सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबाजी राठोड, पोलीस अंमलदार गोरे, सुशेन पवार, मनोज परजणे सय्यद आशपाक यांनी केली आहे.

धाराशिवमध्ये मराठा समाज आक्रमक; संतोष देशमुख खून प्रकरणी आरोपींना अटक करण्याची मागणी

धाराशिव । प्रतिनिधी

मस्साजोग (ता. केज, जि. बीड) येथील सरपंच आणि मराठा समाजातील कार्यकर्ते संतोष पंडितराव देशमुख यांचे ९ डिसेंबर रोजी अपहरण करून खून करण्यात आला. या घटनेचा निषेध करत सकल मराठा समाजाने धाराशिव जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. या निवेदनात, या खून प्रकरणाचा तपास जलद गतीने करून सर्व संबंधित आरोपींना अटक करण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा, सकल मराठा समाज तीव्र आंदोलन उभारेल असा इशाराही देण्यात आला आहे. संतोष देशमुख हे मस्साजोग गावचे सरपंच होते आणि मराठा समाजातील कार्यकर्ते होते. त्यांच्या खुनामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आरोपींना अटक करण्यासाठी ठिकठिकाणी रास्ता रोको आंदोलने करण्यात येत आहेत. सकल मराठा समाजाने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, श्री. संतोष देशमुख यांच्या खुनामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात येत असून नागरिकांना भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आरोपीच्या अटकेसाठी ठिकठिकाणी रास्ता रोको आंदोलने करण्यात येत आहेत. श्री. संतोष देशमुख हे मस्साजोग गावचे सरपंच होते. सदर घडलेला प्रकार अतिशय गंभीर आहे. त्यामुळे सदर प्रकरणाच्या मुळाशी जाऊन सर्व संबंधित आरोपींना अटक करुन कठोर शासन करणे अत्यंत गरजेचे आहे. या निवेदनावर बलराज रणदिवे ,अभिजीत माणिकराव सूर्यवंशी, अजय अंकुश नाईकवाडी, उमेश वसंत मगर, मुकुंद लक्ष्मण घाटगे, आकाश मुंडे, संकेत सूर्यवंशी, गणेश साळुंके, अमोल जाधव आणि अंकुश मगर यांच्या सह्या आहेत.

सर्वत्र श्री गुरुदत्तात्रेय जन्मोत्सव साजरा ; कुक्कडगाव येथे देखील मोठ्या उत्साहात जयंती साजरी

बीड । प्रतिनिधी

जगभरामध्ये सर्वत्र श्री गुरुदत्तात्रेय जन्मोत्सव ठीक ठिकाणी साजरा करण्यात आला प्रत्येक श्री दत्ताच्या मंदिरामध्ये गेल्या सहा दिवसापासून गुरुचरित्र पारायण हे भाविकांच्या वतीने करण्यात श्री गुरुचरित्र पारायण करण्यात आले याच पार्श्वभूमीवर बीड तालुक्यातील सर्वात अग्रेसर असलेले कुक्कडगाव येथील श्री गुरु दत्त मंदिरामध्ये देखील प्रतिवर्षेप्रमाणे याही वर्षी अतिशय मोठ्या थाटामाटा मध्ये व मोठ्या उत्साहामध्ये श्री हरिभक्त परायण गोवर्धन महाराज पवार श्री दत्त संस्थान कुक्कडगाव यांच्या वतीने गेल्या सहा दिवसापासून श्री गुरुचरित्र पारायण श्री वेदशास्त्र संपन्न नितीन जी महाराज देवा कुलकर्णी कुक्कडगावकर यांच्या पवित्र वाणीतून संपन्न झाले त्यानंतर श्री गुरुदत्तात्रेयाचा रुद्राभिषेक होऊन सर्व गावकऱ्यांच्या भजनी मंडळाच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ऋतू काल हेमंत नक्षत्र रोहिणी पूर्ण अवतार अवतरले श्री गुरुदत्त या श्री संतांच्या अभंगावरती गावातील भजनी मंडळांनी अभंग घेऊन भजनी मंडळाच्या व सर्व गावकऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री दत्त जन्मोत्सव संपन्न झाला आणि दिनांक १५ रोजी रविवारी श्री महाप्रसादाचे श्री दत्त संस्थान च्या वतीने आयोजन करण्यात आले आहे तरी सर्वच भाविक भक्तांनी महाप्रसाद सेवन करावा असे श्री दत्त संस्थानचे हरिभक्तपरायण गोवर्धन महाराज पवार यांच्या वतीने कळविण्यात आले आहे.

शासकीय अधिकाऱ्यांनी कामाबाबत सकारात्मकता दाखवून गेल्या दहा वर्षातील रेंगाळलेली कामे तातडीने पूर्ण करावीत

नवनिर्वाचित आमदार सुरेश धस यांची विकास आढावा बैठकीत सूचना

आष्टी । प्रतिनिधी

सन २०१४ पासून आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हिताची अनेक कामे रखडली असून या कामांना प्राधान्याने गती देऊन ही कामे पूर्ण करावीत..यासाठी शासकीय अधिकाऱ्यांनी कामात सकारात्म कता दाखवावी विकास कामे करताना कोणताही भेदभाव न ठेवता कठोर भूमिका ठेवून काम करा तुम्हाला काम करताना काही अडचणी आल्यास मी तुमच्या पाठीमागे खंबीर उभा आहे मात्र तुम्ही देखील आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी सतर्क रहावे अशा सूचना नवनिर्वाचित आमदार सुरेश धस यांनी आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील सर्व खाते प्रमुखांच्या विकास आढावा बैठकीमध्ये दिल्या

या बैठकीसाठी उपविभागीय अधिकारी नसीमा शेख यांच्यासह आष्टी, पाटोदा,आणि शिरूर का .येथील तहसीलदार, गटविकास अधिकारी, दुय्यम निबंधक, पोलीस निरीक्षक, गटशिक्षण अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, पाटबंधारे, बांधकाम, ग्रामीण पाणीपुरवठा, पाटबंधारे, या विभागांचे उप अभियंता आणि इतर सर्व खाते प्रमुख उपस्थित होते पुढे बोलताना..आ.सुरेश धस म्हणाले की, आष्टी तालुक्यातील खुंटेफळ साठवण तलाव हा माझा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये वरदान ठरणारा प्रकल्प आहे गेल्या दहा वर्षांमध्ये आवश्यक त्या गतीने कामे झाली नाहीत ती आता तातडीने पूर्ण करावयाची आहेत पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील असलेले सिंदफणा मध्यम प्रकल्प, उखळवाडी कारेगाव पांगरी जाधववाडी या तलावांची उंची वाढवण्याचे काम २०१४ पासून रखडलेले आहे ही कामे वेगाने पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेले संयुक्त मोजणी आणि इतर कामे संबंधिताने तातडीने करावीत..

पैठण पंढरपूर राष्ट्रीय महाम ार्गावरील भूसंपादनाची अनेक प्रकरणे प्रलंबित असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये जमिनीचा मोबदला न मिळाल्यामुळे असंतोष आहे या कामी तात्काळ लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे सांगून शिरूर तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये मोठा घोटाळा असून त्याची चौकशी करून या भ्रष्टाचारामध्ये सहभागी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई प्रस्तावित करणार असल्याचे त्यांनी सांगितले आष्टी तालुक्यातील ठोंबळ सांगवी आणि गहूखेल येथील प्रकल्पाचेही काम २० १४ पासून रखडलेले आहे

महावितरण कंपनीकडून अनियमित विद्युत पुरवठा

बीड । प्रतिनिधी

शहरातील ऐतिहासिक कारंजा टावर ते बलभीम चौक या मोठ्या भागात गेल्या अनेक दिवसांपासून महावितरण कंपनीकडून अनियमित विद्युत पुरवठा करण्यात येत असल्याने दिवसातून दहा वेळेस या परिसरात लाईट बंद होत आहे. एकदा गेली की लवकर येत सुद्धा नाही. यामुळे या भागातील व्यापाऱ्यांसह नागरिकही मोठ्या प्रमाणात त्रस्त झाले आहेत. अशी माहिती मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून दिली आहे. याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, महावितरण कंपनीकडून दिवसेंदिवस वाढविण्यात येत असलेले वीज युनिट चे बील दरमहा भरून सुद्धा महावितरण कंपनी शहरातील अनेक भागात सुरळीत विद्युत पुरवठा करण्यास आजही पूर्णपणे सक्षम नसल्याचे दिसून येत आहे. दोन-तीन महिने जर वीज बिल थकीत राहिले तर महावितरण कंपनीचे अभियंता आणि कर्मचारी मोठा लावाजमा घेऊन थकीत बिल राहिलेल्या ग्राहकांचा विद्युत पुरवठा कापून टाकतात. एवढी तत्परता मात्र महावितरण कंपनी विद्युत पुरवठा नियमित व सुरळीत ठेवण्यासाठी मात्र दाखवीत नसल्याचा प्रत्यय शहरातील अनेक भागात येतो आहे. असाच अनुभव गजबजलेल्या ऐतिहासिक कारंजा टावर पासून ते बलभीम चौक पर्यंतच्या मोठ्या भागात गेल्या अनेक दिवसांपासून येत आहे. या भागात दिवस-रात्र दहा वेळेस विद्युत पुरवठा खंडित केला जातो. एकदा लाईट गेली की लवकर येत सुद्धा नाही. यामुळे मोठी बाजारपेठ असलेल्या या भागातील व्यापारी वर्ग आणि येथील रहिवासी नागरिक मोठ्या प्रमाणात त्रस्त झाले आहेत. महावितरण कंपनीने या भागातील विद्युत पुरवठा सुरळीत करावा अशी मागणी करू लागले आहेत. विशेष म्हणजे महावितरण कंपनीचे दोन कर्तव्यदक्ष लाईनमन जे कर्तव्यावर असताना शहरातील इतर भागात अत्यंत तत्परतेने आपली सेवा देतात आणि विद्युत पुरवठा सुरळीत ठेवतात ते याच बलभीम चौक भागात राहतात.

विहामांडवा येथे शेतवस्तीवर चोरांचा धुमाकूळ, वृद्ध गंभीर; सोन्याच्या दागिन्यांसह रोख ८० हजार पळवले

पाचोड । प्रतिनिधी

पैठण तालुक्यातील विहामांडवा परिसरात (दि.१०) डिसेंबर रोजी मध्यरात्री वडगाव रस्त्यालगत असलेल्या शेतवस्तीवर आठ ते दहा चोरट्यांनी जवळपास दोन तास धुमाकूळ घातला वृद्धाला जबर मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना घडली. याप्रकरणी अप्पर पोलीस अधिकारी डॉ. सुनील लांजेवार, उपविभागीय पोलिस अधिकारी सिद्धेशर भोरे यांनी घटनास्थळी पाहणी करून जखमींशी चर्चा केली आहे. याविषयी अधिक माहिती अशी की, विहामांडवा परिसरात वडगाव रस्तालागत आजम मेहबूब पठाण हे स्वतःच्या शेतामध्ये पत्नीसह वास्तव्यास आहेत. या ठिकाणी रात्री चोरट्यांनी धुमाकूळ घालून राहत असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये घुसून सोन्याच्या दागिन्यांसह गावरान कोंबडी व रोख रक्कम असा अंदाजे ८० हजारांचा ऐवज लंपास करून आपला मोर्चा काही अंतरावर शेतवस्तीवर राहत असलेल्या अण्णासाहेब बर्डे यांच्या शेतवस्तीकडे वळवला. अण्णासाहेब बर्डे यांना गंभीर मारहाण करून जखमी केले. त्यांच्या पत्नीच्या गळ्यातील, कानातील सोने काढत असताना कानाला गंभीर जखम झाली. हजारो रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस , जमादार किशोर शिंदे यांनी घटनास्थळी भेट दिली. वरिष्ठांना माहिती देताच पाचोड पोलिस स्टेशनच्या प्रभारी पोलिस निरीक्षक जनाबाई सांगळे यांनी आपल्या कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी भेट दिली व शानपथक, ठसे तज्ज्ञ यांना पाचारण केले. मात्र वृद्ध व्यक्तीस मारहाण झाले असल्याने या घटनेचे गांभीर्य ओळखता छत्रपती संभाजीनगर ग्रामीणचे अप्पर पोलीस अधिकारी डॉ. सुनील लांजेवार, पैठणचे पोलीस उपविभागीय अधिकारी सिद्धेशर भोरे यांनी आज जखमी वृद्धांशी चर्चा करून झालेली घटने बाबतीत चर्चा केली असून लवकरच चोरट्यांना अटक केली जाईल, असा विशास त्यांनी व्यक्त केला आहे.

११ वे अंबाजोगाई साहित्य संमेलनाचा आज समारोप

नागरीकांना सहभागी होण्याचे ; स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार यांचे आवाहन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मराठवाडा साहित्य परिषद शाखा अंबाजोगाईच्या वतीने येत्या १४ व १५ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाचा आज समारोप होणार आहे. आज या साहित्य संमेलनात तीन परिसंवाद आणि सायंकाळी ४ वाजता समारोपीय सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व उपक्रमास शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन अधिकाधिक साहित्यिकांनी सहभागी व्हावे याचे आवाहन स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार यांनी केले आहे. मराठवाडा साहित्य परिषदेच्या अंबाजोगाई शाखेच्या वतीने प्रति दोन वर्षी अंबाजोगाई साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येते. लोकाश्रयावर आधारीत असलेले हे ११ वे अंबाजोगाई साहित्य संमेलन यावर्षी १४ डिसेंबर रोजी या संमेलनाचा उद्घाटन सोहळा, निमंत्रितांचे कवी संमेलन व खुले कवी संमेलन अतिशय उत्साहाच्या वातावरणात पार पडले. आज या संमेलनाचा दुसरा दिवस असून सकाळी १० ते १२ या कालावधीत नव्या शैक्षणिक धोरणात भाषा शिक्षण या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. या परिसंवादाचे अध्यक्ष डॉ. सिध्देश्वर बिराजदार हे राहणार आहेत तर परिसंवादात श्रीधर नागरगोजे, राम शेळके आणि सय्यदा सालेमला जबी हे सहभाग घेणार आहेत. दुपारी १२ ते १ या वेळ चहलपहल साठी राखीव ठेवण्यात आला आहे.

परभणीतील कोंबींग ऑपरेशन थांबवून आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्या : आ.संदीप क्षीरसागरांची पोलीस महासंचालकांकडे मागणी

बीड । प्रतिनिधी

परभणी येथे भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीचा अवमान केल्याचा प्रकार घडला होता. याचा निषेध म्हणून आंबेडकरी सम ाजबांधवांनी परभणीमध्ये आंदोलन केले होते. त्यामुळे अनेक समाजबांधवांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत आणि होत आहेत. तसेच कोंबींग ऑपरेशन करून नागरिकांना मारहाण केली जात आहे. दरम्यान भारतीय राज्यघटना म्हणजे आपल्या अस्मितेचा विषय असल्याने त्याबाबत कसलीही अवहेलना समाज खपवून घेऊ शकत नाही. या भावनेतून हे आंदोलन करण्यात आले होते. तरी पोलिस प्रशासनाने कोंबिंग ऑपरेशन थांबवून, आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्यावे अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

परभणी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर घटनाकार, महाम ानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा आहे व पुतळ्याच्या जवळच भारतीय संविधानाची प्रतिकृती साकारलेली आहे. मंगळवारी (दि.१०) रोजी या संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना एका म ाथेफिरूकडून करण्यात आली. शेवटी भारतीय संविधान हा सर्वांच्याच अस्मितेचा विषय आहे. त्यामुळे या घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी समाजबांधवांनी आंदोलने केली. आंदोलनाला अल्प प्रमाणात हिंसक वळण आले. त्यामुळे पोलिसांकडून कोंबिंग ऑपरेशन करून आंदोलकांवर गुन्हे दाखल करणे सुरू आहे. परंतु या आंदोलनाचा हेतू हा मुळीच हिंसा पसरवणे नव्हता. समाजबांधवांनी लोकशाही मार्गानेच आंदोलन केले होते. परंतु अशा आंदोलनाच्या आडून काही प्रवृत्ती हिंसा पसरविण्याचे काम करत असतात हे बर्याचवेळा लक्षात आले आहे. ही बाब लक्षात घेत, कोंबिंग ऑपरेशन थांबवून आंदोलकांवर दाखल झालेले गुन्हे मागे घ्यावेत अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे पोलिस महासंचालक यांच्याकडे केली आहे.